Impact Factor - 0.241 | Special Issue - I June 2021 | ISSN 2250 - 0383

Itihas Sankalan Patrika

# SHODHANKAN

International Half Yearly
Peer Reviewed Refereed
Research Journal




## Special Issue on

# Ancient Indian Iconography & Architecture

**Organized by**

**Shri Sarda Education Society (Trust)'s**
(A Linguistic Minority Educational Institute)

**SMT RADHABAI SARDA ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
**ANJANGAON SURJI - 444705,**
**DIST - AMRAVATI (Maharashtra)**
(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)

**Executive Editor**
Dr Nitin Ulhasrao Saraf

**Guest Editor**
Dr Arvind Sontakke

**Guest Publisher**
Dr Bashisth Choubey
Principal

Scanned by CamScanner

मूर्तीशास्त्र संशोधन संस्था

Shri Sarda Education Society (Trust)'s
(A Linguistic Minority Educational Institute)

# Smt Radhabai Sarda Arts, Commerce & Science College, Anjangaon Surji, Dist. - Amravati

Affiliated to : Sant Gadge Baba Amravati University, Amravati

**Organizes**

**An Interdisciplinary National Level One Day e-Conference**

**of**

***Iconography Research Society, Maharashtra***

***1st Annual Conference***

***on***

# "Ancient Indian Iconography and Architecture"

**Sunday – 20th June 2021**

**Chief Patron**
**Hon'ble Shri AbhayNandkishorji Sarda**
Chairman, Shri Sarda Education Society, Anjangaon Surji

**Hon'ble Dr Amar Rameshchandrji Sarda**
Secretary, Shri Sarda Education Society, Anjangaon Surji

**Inaugurator**
**Parampujya Acharya Swami Shri Jitendranath Maharaj**

**Keynote Speaker**
**Prof Deepak Kannal**(Gujarat)

**Chief Guest**
**Prof. Maruti Nandan Pd. Tiwari** (Uttar Pradesh)
**Dr J. Mothilal** (Telangana)
**Dr G. K. Mane** (Maharashtra)

**Organizer**
**Principal, Dr. Bashisth Choubey**

Co-Convener
**Prof Beena Rathi**
Dept. of English

Convener
**Dr Nitin Saraf**
Dept. of History



Scanned by CamScanner

Shri Sarda Education Society (Trust)'s
(A Linguistic Minority Educational Institute)

# Smt Radhabai Sarda Arts, Commerce & Science College, Anjangaon Surji, Dist. - Amravati

Affiliated to : Sant Gadge Baba Amravati University, Amravati

**Organizes**

**An Interdisciplinary National Level One Day e-Conference**

**of**

***Iconography Research Society, Maharashtra***

***1st Annual Conference***

***on***

# "Ancient Indian Iconography and Architecture"

**Sunday – 20th June 2021**

**Chief Patron**
**Hon'ble Shri AbhayNandkishorji Sarda**
Chairman, Shri Sarda Education Society, Anjangaon Surji

**Hon'ble Dr Amar Rameshchandrji Sarda**
Secretary, Shri Sarda Education Society, Anjangaon Surji

**Inaugurator**
**Parampujya Acharya Swami Shri Jitendranath Maharaj**

**Keynote Speaker**
**Prof Deepak Kannal**(Gujarat)

**Chief Guest**
**Prof. Maruti Nandan Pd. Tiwari** (Uttar Pradesh)
**Dr J. Mothilal** (Telangana)
**Dr G. K. Mane** (Maharashtra)

**Organizer**
**Principal, Dr. Bashisth Choubey**

Co-Convener
**Prof Beena Rathi**
Dept. of English

Convener
**Dr Nitin Saraf**
Dept. of History



Scanned by CamScanner

Shri Sarda Education Society (Trust)'s
(A Linguistic Minority Educational Institute)

## Smt.Radhabai Sarda Arts, Commerce & Science College, Anjangaon Surji, Dist. - Amravati

Affiliated to: Sant Gadge Baba Amravati University, Amravati

organizes

**An Interdisciplinary National Level One Day e-Conference**
**of**
***Iconography Research Society, Maharashtra***
***1 st Annual Conference***
***on***

# "Ancient Indian Iconography and Architecture"

**Sunday – 20th June 2021**

**(For this issue only)**

**Dr. Nitin Ulhasrao Saraf**
Executive Editor

**Dr. Arvind Sontakke**
Guest Editor

**Editorial Board**

Dr. Vyanktesh Lamb, Aurangabad
Dr. Mukund Devarshi, Beed
Dr. Kamaji Dak, Aurangabad
Dr. Kavita Tathed, Yavatmal
Dr. Shanti Jadhvar Gite, Dahiphal Wadmauli,
Dr. Rambhau Mutkule, Vasmat (Hingoli)
Mr. Laxmikant Sonwatkar, Parbhani
Dr. Jyoti Pethkar, Mandnagad
Dr. Vinod Raipure, Jalgaon
Dr. Surendra Shirsat, Pune
Mr. Aaditya Phadke, Kolhapur

**Peer Reviewed Committee**

Dr. Pradip Kumar Mandal, Manbazar (WB)
Dr. Naresh J. Parikh, Kadi, (North Gujrat)
Dr. Sushim Pagare, Indore
Dr. Prabhakar Dev, Nanded (MS)
Dr. Santosh Bansod, Amravati
Dr. Satish Kadam, Kolhapur,
Dr. Sumitra Hembram Dumka (Jharkhand)

**Organizing Committee**

Prof. Sangita Jawanjal
Ms.Navita Malani
Dr. Satyendra Gadpayle
Dr. Vivek Patil
Shri. Gopal Bagdi
Shri. Ram Kulkarni

**-Venue-**

**Smt Radhabai Sarda Arts, Commerce & Science College, Anjangaon Surji**

**Published By**
**ITIHAS SANKALAN SANSTHA MAHARASHTRA**
Dr. Radhakrishna Joshi
22 B, "Prathmesh Omkareshwar Bunglow,
Behind Savedi Bus-Stand, Savedi, Ahmadnagar-414001
Email: itihassankalan2020@gmail.com n Mob 7972236844 / 9765351115



Scanned by CamScanner

# *INDEX*



| Sr. No. | Article Name | Author | Pg. No. |
|---|---|---|---|
| 1 | वाकाटककालीन मराठवाड्यातील विष्णूमूर्ती | प्रा डॉ जी एस पाटील | 12 |
| 2 | दिक्पाल | प्रा डॉ हमीद उमर अली काझी | 17 |
| 3 | मंदिर स्थापत्य व मूर्ती संदर्भात दगडांचे निकष | श्री लक्ष्मीकांत नारायणराव सोनवटकर | 23 |
| 4 | वाकाटक कालीन मंदीर स्थापत्य | डॉ मिनल खेरडे | 29 |
| 5 | कोंडाणे बौद्ध लेणी | प्रा नागोराव तारू | 35 |
| 6 | बहादरपुरा येथील राष्ट्रकुट भवन वस्तूसंग्रहालयातील सूर्य व नंदी प्रतिमा | प्रा नामदेव तुकाराम बडगिरे | 37 |
| 7 | अतुलनीय रावणानुग्रह शिवमूर्ती : विशेष संदर्भ वेरूळ लेणी | अनिता प्रल्हाद आढागळे | 39 |
| 8 | पिंपळे ता. इंदापूर येथील तीन मूर्तींची ओळख | डॉ. शामराव घाडगे . | 42 |
| 9 | नवग्रह : एक ऐतिहासिक मागोवा | डॉ ज्योती पेठकर, डॉ अरविंद सोनटक्के | 44 |
| 10 | राष्ट्रकुटांची उपराजधानी कंधार परिसरातील जैन शिल्पवैभव | प्रा विनायक दिलीप हिरे | 52 |
| 11 | शिल्पप्रकाश ग्रंथामधील अलसा यंत्र आणि मंदिरावरील सुरसुंदरी शिल्पे यांचा चिकित्सक अभ्यास (अध्ययन क्षेत्र: कोप्पेश्वर आणि आदिनाथ मंदिर, खिद्रापूर) | श्री योगेश प्रभुदेसाई, मानसी चौगुले | 54 |
| 12 | सातवाहन व तेर कालीन लज्जागौरी उपासना | डॉ. रमेश दत्तात्रय गंगथडे | 59 |
| 13 | राष्ट्रकुटकालीन मराठवाड्यातील जैन पार्श्वनाथ मुर्ती | डॉ चंदन एम. बावलगावे | 61 |
| 14 | कामशिल्पांचा संगीत शिल्पांशी अनुबंध | डॉ अरविंद सोनटक्के , श्री किशोर बोरकर | 63 |
| 15 | पंढरपूर जि.सोलापूर येथील चंद्रभागा पात्रात मिळालेली निऋतीची प्रतिमा | प्रा.डॉ.माया ज. पाटील श्री. ज्ञानेश्वर सतिश झरकर | 66 |
| 16 | मानूर (नागनाथ) येथील सिद्धेश्वर मंदिर व अन्य पुरावशेष | डॉ. विजय सरडे | 69 |
| 17 | शिरपूर येथील राष्ट्रकुट कालीन मंदिर स्थापत्य | प्रा रवी आत्माराम बाविस्कर | 75 |
| 18 | श्री विठ्ठल मूर्तीचे मुर्तीशास्त्र | श्री राजकुमार सोनलाल जानवळे | 81 |
| 19 | निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिर : शिल्पकलेचा अलौकिक नमुना | डॉ सुभाष बेंजलवार | 84 |
| 20 | पेडगावच्या लक्ष्मीनारायण मंदिराच्या बाह्यांगावरील मूर्ती | डॉ सुरेंद्र अर्जुन शिरसट | 87 |
| 21 | तेरची हस्तिदंती मूर्ती | डॉ नितीन उल्हासराव सराफ | 92 |
| 22 | कान्हेरी लेणीतील तारा-मूर्तीशास्त्राच्या दृष्टीने घेतलेला आढावा | डॉ अश्विनी पतंगे | 94 |
| 23 | 'भारतीय मूर्तिकला में गणेश प्रतिमाओं का विकास' | डॉ. संजय कुमार सिंह | 97 |
| 24 | Significance of Idols and Temples in Hinduism | Dr Ravi Subhashrao Satbhai | 99 |
| 25 | The *Dikpalas* (Guardian Deities) Over the *Gopuram* of the Kailasa Cave temple, Ellora, Dist. Aurangabad, Maharashtra | Shalaka Pravinkumar Bhandare | 101 |





Scanned by CamScanner

# निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिरः शिल्पकलेचा अलौकिक नमुना

डॉ. सुभाष बेंजलवार,
इतिहास विभागप्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा.
sbenjal@gmail.com

हैद्राबादच्या निजाम राजवटीत वर्तमान लातूर जिल्ह्यातील निलंगा हे बिदर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण होते. इस. १९४८ मध्ये निजामाची सत्ता संपुष्टात आल्यानंतरही काही काळ निलंगा बिदर जिल्ह्याचाच भाग राहिला. इस.१९५६ च्या राज्य पुनर्रचनेनुसार निलंगा तालुका उस्मानाबाद जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. पुढे उस्मानाबाद जिल्ह्यातून १६ ऑगस्ट १९८२ मध्ये लातूर जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर निलंगा तालुका लातूर जिल्ह्याचा समाविष्ट करण्यात आला. निलंगा हा महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या सीमावर्ती प्रदेशातील तालुका असून दक्षिणेतील ऐतिहासिक कालापासून या प्रदेशावर अनेक राजघराण्यांची सत्ता होती. कल्याणीच्या चालुक्य काळात निलंगा आणि परिसरात मोठ्या प्रमाणात मंदिर निर्मिती झालेली पाहायला मिळते.निलकंठेश्वर महात्म्य नावाच्या ग्रंथात निलंगा शहर व परिसराची माहिती मिळते. 'निलंगा या ठिकाणचे प्राचीनत्व नावाच्या विकासातून दिसते. प्राचीन काळी हा प्रदेश दंडकारण्याने वेढलेला असून या दंडकारण्यात श्रीशृंग नावाचा पर्वत होता. या पर्वतालाच निर्लिंग असेही म्हटले जाई. हेच निर्लिंग निलेवाडीमध्ये परिवर्तीत झाले आणि पुढे निलेवाडीचे निलावती व पुन्हा निलंगा असे झाले'[१] या परिसरात पूर्व मध्ययुगातील अनेक मंदिरे आजही चांगल्या स्थितीत आहेत. या मंदिरांवरून तत्कालीन संपन्न अशा ऐतिहासिक, सांस्कृतिक विशेषत: स्थापत्य कलेच्या वैभवशाली परंपरेची प्रचीती येते. मूळ निलंगा शहराच्या पूर्वेकडील वस्तीच्या मध्यभागी निलकंठेश्वराचे मंदिर आहे. निलंगा परिसरात तळीखेड, भुतमुगळी, निटूर या ठिकाणी मंदिरे आहेत. यापैकी स्थापत्य व शिल्पकलेच्या दृष्टीने निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिर हे समृद्ध आहे. या मंदिर स्थापत्याचा व शिल्पकलेच्या अलौकिक नमुन्याचा प्रस्तुत शोधनिबंधात आढावा घेण्यात आला आहे.

भारतातील किंबहुना महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्याचा पाश्चात्य व भारतीय अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणात अभ्यास केला असला तरी मराठवाड्यातील बरीचशी मंदिरे ही दुर्लक्षित राहिली आहेत. 'निलंगा हा प्रदेश सीमावर्ती स्वरूपाचा असला तरी या प्रदेशाची ऐतिहासिक व सांस्कृतिक संपन्नता ही इतर महाराष्ट्राशी बरोबरी करणारी आहे. भारतीय मंदिर स्थापत्याचा सांगोपांग अभ्यास पाश्चिमात्य व पौर्वात्य तज्ञांनी केलेला असला तरी महाराष्ट्रातील मंदिराकडे त्यांचे जावे तसे लक्ष गेलेले नाही आणि या बाबतीत सगळ्यात दुर्लक्षित राहिला तो मराठवाड्याचा भाग'[२] अभ्यासक, संशोधक यांच्याबरोबरीनेच पुरातत्व विभागाचेही मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले असल्यामुळे मराठवाड्यातील बा-याच मंदिरांचे प्राचीनत्व लुप्त होत चालले आहे. तथापि निजामी राजवटीतील आक्रमकांचे अनेक घाव सोसूनही निलंगा येथील मंदिर आणि बहुतांश शिल्पकला ही सुस्थितीत आहेत हे विशेष होय.

निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिरालाच हरिहरेश्वर मंदिर म्हणूनही ओळखले जाते. या संदर्भात दंतकथा आलेली आढळते, 'कृतयुगात निलंगा येथे शूरसेन नामक शिवभक्त राजा व त्याची विष्णूभक्त राणी राहत होती. त्यांच्या भक्तीने त्यांना हरिहर प्रसन्न झाले.वरादाखल राजा-राणीने देवांना येथेच वास करण्याची विनंती केली. त्यामुळे हरीहराने निर्लिंगी क्षेत्री वास केला.'[३] अशी ही दंतकथा निलकंठेश्वर महात्म्य या ग्रंथात आली आहे. ही दंतकथा जरी असली तरी मंदिराच्या मुख्य शैव गर्भगृहासोबत एक उपगर्भगृह हे विष्णू या देवतेशी संबंधित आहे. शिवाय मंदिराच्या बह्यांगावरील वैष्णव शिल्पप्रतिमांमुळे हे मंदिर हरिहरेश्वर हरी= वैष्णव व हर= शैव या नावाने ओळखल्या जात असावे.

कल्याणीच्या चालुक्य काळात या मंदिराची निर्मिती झाली असल्याचा उल्लेख रामलिंग-मुदगड येथील शिलालेखात आढळतो. 'यानुसार नरवैद्य नारायणभट्टाने हे मंदिर चालुक्य काळात बांधले असावे'[४] असे वाटते. मंदिराच्या स्थापत्य शैलीवारुन्ही हे मंदिर कल्याणीच्या चालुक्य काळातीलच असल्याचे स्पष्ट होते. या काळातील बहुतांश मंदिरे.हेमाडपंथी शैलीची आहेत. त्याचबरोबर या मंदिर शैलीवर शेजारच्या होयसळ स्थापत्य शैलीचाही प्रभाव पडल्याचे मत मंदिर स्थापत्य कलेचे अभ्यासक डॉ. प्रभाकर देव यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, 'मराठवाड्याच्या दक्षिणेस लगतच असलेल्या म्हैसूर राज्यातील होयसळ देवालयीन पद्धतीचा बराच प्रभाव उस्मानाबाद जिल्ह्यातील देवालयांवर प्रामुख्याने प्रकर्षाने जाणवतो. त्याचप्रमाणे आंध्र प्रदेशातील पूर्व-चालुक्य देवालयीन पद्धतीचाही प्रभाव दर्शवणारी काही देवालये मराठवाड्यात आढळतात... इ.सनाच्या आठव्या शतकापासून ते १४ व्या शतकापर्यंतच्या सर्वच देवालयांना पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे या भागातही हेमाडपंथी हे संबोधन लावले जाते.'[५] त्यामुळे हे मंदिर हेमाडपंथी शैलीचेच म्हणून ओळखले जाते.

**मंदिराचे अंतरंग:**

राष्ट्रकुट काळातील प्रारंभीची मंदिरे ही एक गर्भगृह, प्रदक्षिणापथ अंतराळ, गूढमंडप आणि मुखमंडप अशा स्वरुपाची होती. नंतरच्या काळात या शैलीचा विकास व विस्तार घडून आला आणि त्यातूनच त्रिदलीय पद्धतीची मंदिरे निर्माण झाली. त्रिदलीय मंदिर शैलीत आवश्यकतेनुसार स्तंभांची संख्याही वाढलेली पाहायला मिळते. पूर्वीच्या दोन अर्धमंडपांच्या जागी दोन गर्भगृह आणि मंदिराचे प्रमुख गर्भगृह अशी तीन गर्भगृह असलेली, गूढमंडपाची त्रिदल पद्धतीची मंदिरे निर्माण झाली. या स्थापत्यशैलीत या शिल्पाविष्काराला प्रचंड वाव मिळाला. बाह्यभिंतीवर प्राचीन शिल्पकारांनी स्त्रीसौंदर्याचा अप्रतिम अविष्कार घडवला. नृत्याविष्कारातील निरनिराळे पदन्यास, नर्तीकांच्या तालबद्ध हालचाली, भावपूर्ण मुद्रा इथे पाषाणातून साकारल्या.'[६] या त्रिदलीय मंदिरालाच त्रीगर्भी (तीन गर्भगृहे) मंदिर असेही म्हटले जाते. या तीन गर्भागृहांपैकी पूर्वाभिमुख असलेले मुख्य गर्भगृह हे शिवाचे असून त्यात शिवलिंग प्रतिष्ठित केलेले आहे. तर दक्षिणाभिमुख दुय्यम गर्भगृह हे विष्णूस समर्पित आहे. त्यात केशव मूर्ती आहे. उत्तराभिमुख आणखी एक दुय्यम गर्भगृह हे हर-गौरीस समर्पित आहे.



Scanned by CamScanner

'त्रीगर्भी मंदिराच्या द्वारमंडपास लागून मुख्य मंडप, अंतराळे व त्यापुढे गर्भगृहे आहेत. मंडपाच्या दोन्ही बाजूची रचना एकसमान असून प्रथमदर्शिनी हा मंडप क्रुसाच्या आकाराचा भासतो, तर गर्भगृहे तारकाकृती आहेत. उत्तर, पश्चिम व दक्षिणेकडील कोण प्रत्येकी अकरा कोनी मंडळाच्या मध्यभागी येतात, तर अकरा कोनांचे मंडळ अंत:कक्ष आणि प्रवेशमार्गाच्या भागात लुप्त आहे.'[७] मंदिराचा तलविन्यास हा विस्तीर्ण आहे. मुख्य गर्भगृहाशिवाय अन्य दोन उपगर्भगृहांमुळे मंदिराचा आकार होयसळ मंदिर स्थापत्य कलेप्रमाणे बिल्वदलीय बनला आहे. अशा मंदिरांच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात स्तंभ वापरले जातात. मंदिराच्या द्वारमंडपास लागून मुख्य मंडप आहे. हा मंडप चौकोनी असून तो १६ खांबांवर मोठ्या कल्पकतेने उभारला गेला आहे. खांबांवरील नक्षीकाम अत्यंत सुबक असे आहे. त्यात बा-याच ठिकाणी रामायण महाभारतातील कथानके शिल्पित केले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी वेली व मोर यांचीही शिल्प पहावयास मिळतात. मंडपाचे छत सप्तमातृका, कीर्तिमुख, नृत्यांगना यासारख्या विविध शिल्पांनी सुशोभित करण्यात आले आहे.

मंदिरातील मुख्य गर्भगृह मंडपाच्याच समोर असून यात प्रमुख उपास्य दैवत शिवलिंग आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार कोरीवकामाने सुशोभित आहे. 'हे प्रवेशद्वार सप्त द्वारशाखी म्हणजेच हस्तिनी वर्गातील आहेत. मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या द्वारशाखांमधील म्हणजेच पहिल्या दोन उभ्या पट्ट्या अनुक्रमे पर्ण व पुष्पशाखेच्या, तिसरी विद्याधरशाखा, चौथी स्तंभशाखा,पाचवी व्यालशाखा, सहावी स्तंभशाखा आणि सातवी पुन्हा पुष्पशाखा अशा आहेत.'[८] येथील द्वारशाखेवर केवळ शिवाच्या चतुर्भुज प्रतिमा आहेत. त्याने आपल्या तीन हातांमध्ये अनुक्रमे डमरू,कवटी आणि शक्ती (त्रिशूळ) पकडलेली असून उजवा अधोहस्त अभयमुद्रेत आहे. या द्वारशाखांच्या खाली शैव प्रतीहारींच्या प्रतिमा तसेच कुंभवाहिनी आणि चामरधारीनींची शिल्पे आहेत. द्वारललाटावर अर्धपर्यंकासनातील गणेश शिल्प आहे.

मंदिरातील दक्षिणाभिमुख दुय्यम गर्भगृह विष्णूस समर्पित आहे. या गर्भगृहाचे प्रवेशद्वार मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशद्वारापेक्षा लहान आहे. हे प्रवेशद्वार पंचद्वारशाखी म्हणजेच नंदीनी वर्गातील आहेत. या द्वारशाखांच्या खाली चामरधारिणी आणि वैष्णव द्वारपाल प्रतिमा आहेत. या गर्भगृहात अतिशय मोहक अशी केशवमूर्ती (विष्णू) प्रतिष्ठापित केलेली आहे. 'केशव मूर्ती या वर्गातील मूर्तीस चारच हात असतात. शंख चक्र, गदा व पद्म ही आयुधे आदलुन बदलून दिली जातात.'[९] या चतुर्भुज मूर्तीच्या उजव्या ऊर्ध्व हातात चक्र, डाव्या ऊर्ध्वहातात शंख, तर उजव्या अधोहातात गदा व डाव्या अधोहातात पद्म आहे.(प्रत्यक्ष निरीक्षण).

उत्तराभिमुख असलेले हर-गौरी समर्पित गर्भगृह हे मंदिरातील तिसरे गर्भगृह होय. याची रचनाही जवळपास दक्षिणाभिमुख विष्णूच्या गर्भगृहासारखीच आहे. हे शैव गर्भगृह असल्यामुळे अर्थातच नंदिनी वर्गातील प्रवेशद्वाराखली शैव प्रतीहरी आहेत. येथील द्वार ललाटावर देवि प्रतिमा आहेत. ही ही 'हर-गौरी मूर्ती म्हणजेच उमा महेश्वर आलिंगनमूर्ती होय. यात उमामहेश्वर सव्य ललीतासन घालून बसलेले असून वेदीवर गणेश व कार्तिकेय यांच्या प्रतिमा आहेत. शिवाच्या डाव्या मांडीवर वामललीतासनात बसलेली आहे. शिव चतुर्भुज असून उजव्या ऊर्ध्वहातात त्रिशूल व उजव्या अधोहातात अक्षयमाला धारण केली आहे. डावा ऊर्ध्वहाताने शिवाने पार्वतीस आलिंगन दिले आहे. तर डावा अधोहात पार्वतीच्या मागे असल्याने दिसत नाही (बहुधा वज्र असावे). पार्वती मात्र द्विभुज असून तिने उजव्या हाताने शिवाच्या मानेस विळखा घालून आलिंगन दिले आहे'.[१०] उमामहेश्वरालिंगन मूर्तीवर दागदागिने प्रचुर प्रमाणात आहेत. त्यातही आकर्षक देहाच्या पार्वतीने मुक्ताहार,केयूर,कुंडल, मेखला,नुपूर, पादपत्रे अशी विविध अलंकार तर जटाधारी शिवाने कंठी मुक्ताहार, बाहुभूषणे, उदरबंध, मेखला, प्रलंबहार इत्यादी अलंकार धारण केले आहेत. याशिवाय तलपटावर शिवाच्या पायालागत वाहन नंदी आहे तर पार्वतीच्या पायाखाली वाहन घोरपड दाखवलेली आहे. अशा प्रकारच्या हर-गौरी प्रतिमा मंदिर शिल्पकलेत दुर्मिळ स्वरूपाच्या आहेत.

तीनही गर्भगृहांचे छत नक्षीविरहीत आहेत. मुख्य गर्भगृह व दक्षिणाभिमुख विष्णू (केशव) गर्भगृहाच्या दरम्यान कोप-यातील दक्षिणाभिमुख देवळीत महिषासुरमर्दिनी शिल्प प्रतिमा आहे तर हर-गौरी व मुख्य गर्भगृह या दरम्यान असलेल्या कोप-यात उत्तराभिमुख देवळीत सप्तमातृका शिल्प पट्टिका आहे.

**मंदिराच्या बह्यांगावरील शिल्पकला:**

मंदिराच्या आतील भागात ज्या प्रकारे स्तंभ,मंडपाचे छत आणि इतर ठिकाणी असलेल्या मूर्ती साचेबंदरित्या निर्माण करण्यात आल्या आहेत अगदी त्याचप्रमाणात बाह्य भिंतीवरील शिल्पकामही साचेबंद रित्या करण्यात आले आहे. मंदिराच्या बह्यांगावरील 'कप्पे शिल्पांनी पुरेपूर भरले आहेत. बाह्य भिंतीवरील देवकोष्टामधील नऊ प्रतीमांशिवाय या भिंतीवर इतर कप्प्यांमध्ये आणखी १०३ प्रतिमा होत्या. सध्या त्यातील ८३ प्रतिमा अस्तित्वात आहेत. भिंतीचा काही मूळ भाग पडल्यामुळे उर्वरित प्रतिमा नाहीशा झाल्या आहेत. उर्वरित ८३ प्रतिमांपैकी केवळ तीनच पुरुष प्रतिमा असून बाकी सर्व स्त्री प्रतिमा आहेत.'[११] यातील अधिकाधिक स्त्री प्रतिमा या सुरसुंदरीच्या आहेत.मंदिराच्या प्रत्येक गर्भगृहाबाहेर तीन देवकोष्ट आहेत. तीन गर्भगृहांची मिळून नऊ देवकोष्ट आहेत. यातील काही देवकोष्टातील मूर्ती नष्ट झाल्या असल्या तरी काही देवकोष्टात महाकाली, शिव, विष्णू, नृसिंह, महिषासुरमर्दिनी आणि वराह इत्यादी देवी-देवतांच्या मूर्ती आहेत.


हे मंदिर चालुक्य कालीन असल्यामुळे मंदिराच्या शिल्पकलेवर चालुक्य परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. चालुक्यांच्या शिल्पकलेतील नाजुकपणा येथेही जाणवतो.या संदर्भात वर्णन करताना डॉ.प्रभाकर देव यांनी म्हटले आहे की, 'स्त्रियांची शिल्पे चिरतरुण आहेत.वक्षभाग उठावदार आहे. दागदागिने मोजकी कोरलेली आहेत. कर्ण-भूषणे सुंदर आहेत. बारीक सारीक तपशील व्यवस्थित कोरलेला आहे. केशरचना आणि त्यावरची आभूषणे सुंदर व आकर्षक आहेत. संपूर्ण मंदिरावरची शिल्पकला सुंदर आहे.'[१२] या वर्णनात बह्यांगावरील शिल्प कोरना-या शिल्पकारांचे शिल्पकलेतील प्राविण्य किती उच्च कोटीचे होते हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

मंदिराच्या बाह्य भिंतीवरील सर्वात आकर्षक मूर्ती म्हणजे सुरसुंदरीची मूर्ती होय. ही सुरसुंदरीची मूर्ती अत्यंत सुंदर, देखणी व भावपूर्ण आहे. "ही सुंदरी उभी असून तिने डाव्या पायावर आपला यौवनभर सांभाळला आहे. तिच्या डाव्या उलट्या व खांद्यावर ठेवलेल्या हातावर पोपट बसलेला



Scanned by CamScanner

आहे. तिच्या उजव्या हातात फळांनी लगडलेली आंब्याची डहाळी असून ती पोपटापासून डोक्यामागे लपविण्याच्या लटक्या प्रयत्नात ती दंग आहे. पण तिच्याकडील पोपटाचे लक्ष तिने लपवलेल्या फळाकडे न जाता तो तिच्या मदमस्त रसरसीत ओठांनाच पक्व फळ समजून चोच मारीत आहे." असे अत्यंत रेखीव आणि कल्पनारम्य शिल्प शिल्पकाराने आपल्या कल्पनाविष्काराने शिल्पित केले आहे. या सुरसुंदरीचे वर्णन करताना बहुतांश लेखकांनी पोपट सुरसुंदरीच्या उन्नत उरोजाला चोच मारीत आहे असे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात सध्या मंदिरावरील बाह्यांगावर उपलब्ध असलेल्या शिल्पांमध्ये लेखकांनी वर्णन केलेले हे शिल्प दिसत नाही. परंतु ओठांना चोच मारीत असल्याचे शिल्प आज उपलब्ध आहे.



(निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिरावरील सूरसुंदरी प्रतिमा)

सारांशत: निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिर म्हणजे शिल्पकलेचा अलौकिक्र नमुनाच म्हणावा लागेल. या त्रीगर्भीय मंदिरातील अंतरंग व बाह्यांग दोन्ही पाहता कलाकारांनी, शिल्पकारांनी आपल्या कल्पनाविष्कारातून निर्माण केलेल्या शिल्पकृती या आजही तत्कालीन सामाजिक, धार्मिक, नैतिक नितीमुल्यांचे दर्शन आपणास घडवतात. देवि-देवतांच्या संदर्भातील धार्मिक कल्पना असतील किंवा मानवी विशेषतः स्त्री सौंदर्याच्या, अलंकार, वेशभूषा, केशभूषा इत्यादी संदर्भातील कल्पना शिल्पकारांनी आपल्या कौशल्याने शिल्पित केल्या आहेत. हा या ठिकाणचा ऐतिहासिक शिल्पविष्काराचा ठेवा आजही सुस्थितीत आहे परंतु याकडे पुरातत्व विभागाचे बा-याच प्रमाणात दुर्लक्षित असलेले पहावयास मिळते. पुरातत्व विभागाने अधिकचे लक्ष दिल्यास या व या परिसरातील मंदिराचे प्राचीनत्व दीर्घकाळ टिकून राहू शकेल.

**संदर्भ:**

१. गर्जे चंद्रकांत, वीर सेनानी आर्य नेता शेषेराव वाघमारे, प्रकाशन- आर्य समाज निलंगा,पृ.३७.
२. जोशी सु.ग. (संपा.), मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक अंक,१९७५. पृ.१९.
३. पाठक अरुणचंद्र (संपा.), महाराष्ट्र राज्य गाझेटियर - लातूर जिल्हा (भाग २), दर्शनिका विभाग पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८. पृ. २०६.
४. पाठक अरुणचंद्र (संपा.), उपरोक्त.
५. महाराष्ट्रातील पुरातत्व, पृ. ९७.
६. देव प्रभाकर (रायरीकर कल्पना -अनु.), मराठवाड्यातील मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत प्रकाशन,२०१७, पृ. ५६.
७. पाठक अरुणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.२०७.
८. देगलूरकर गो.बा.,टेंपल आर्किटेक्चर & स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र, नागपूर युनिव्हर्सिटी, नागपूर,१९७४,पृ.५५.
९. खरे गणेश हरी, मूर्तीविज्ञान, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, २०१२, पृ.२३.
१०. पाठक अरुणचंद्र (संपा.), पृ.२०८.
११. पाठक अरुणचंद्र (संपा.), पृ.२०९.
१२. देव प्रभाकर (रायरीकर कल्पना –अनु.), मराठवाड्यातील मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत प्रकाशन, पुणे, २०१७, पृ.९७.



Scanned by CamScanner